# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी.
## पाणी पुरवठा विभाग

**विषय :- भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत भुयारी गटार योजना टप्पा-२ योजनेच्या उर्वरित कामाच्या भाववाढी बाबत प्रस्तावाच्या अतिरिक्त प्रशासकिय ठरावास मान्यता मिळणे बाबत.**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका हद्दीमध्ये महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत भुयारी गटार योजना टप्पा-२ या प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर आहे. भुयारी गटार योजना टप्पा-२ योजनेच्या प्रगतीच्या अनुषंगाने दि.०८/०९/२०२३ रोजी मा. प्रधान सचिव सो.(२), नगरविकास विभाग, मंत्रालय यांचे दालनात झालेल्या बैठकीत, प्रकल्पाच्या उर्वरीत कामाची चालु दरानुसार किंमत व मंजुर निविदा दरानुसार उर्वरित कामाची भाववाढसह किंमत यातील तफावती बाबत अहवाल सादर करण्याचे निर्देश दिलेले होते. त्या अनुषंगाने प्रकल्पाचे तांत्रिक सल्लागार महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना जा.क्र./भिनिशमनपा/पापुवि/५१३/२०२३, दि.१५/०९/२०२३ रोजीच्या पत्रान्वये प्रकल्पाच्या उर्वरीत कामाची चालु दरानुसार किंमत व मंजुर निविदा दरानुसार उर्वरित कामाची भाववाढसह किंमत यातील तफावती बाबत अहवाल सादर करण्याचे कळविले होते. त्यानुसार मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी दि.११/०१/२०२४ अन्वये भिवंडी मनपास पत्रान्वये कळविले आहे. महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, मंत्रालय यांचे कडील क्रमांक :- नगरो-२०२४/प्र.क्र.५२२/नवि-३३, दि.०४/१०/२०२४ अन्वये समितीचा निर्णय प्राप्त झालेला आहे. सदर निर्णयामध्ये "प्रकल्पाचे काम सुरु असतांना भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिकेकडुन आवश्यक जागा उपलब्ध न झाल्यामुळे प्रकल्पाचे काम विहित कालमर्यादेत पूर्ण झालेले नसल्यास अथवा जी कामे विहित कालमर्यादेत पुर्ण न होण्यास भिवंडी महानगरपालिका जबाबदार असेल केवळ त्याच घटकांसाठी भाववाढ देणे शक्य असुन त्याची परिगणना भिवंडी महानगरपालिकेने करावी व सदर परिगणना व कारणे योग्य असल्याची खातरजमा त्याच प्रकल्पाचे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्या कडुन करुन घेऊन त्यानुसार भाववाढीपोटी देय शुल्क अदा करण्याची शिफारस आहे."

सद्यस्थितीत प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर असुन काम ९५% पुर्ण झालेले आहे. प्रकल्पाचे तांत्रिक सल्लागार महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी उर्वरीत कामासाठी रक्कम रु.११,६१,२४,४१५/- इतकी भाववाढ प्रकल्पास भाववाढ देण्यास शासनाकडुन मान्यता प्राप्त झालेली आहे. त्याअनुषंगाने प्रकल्पाचे कंत्राटदार यांना धावते देयक क्र. २९ ते धावते देयक क्र. ३५ यामध्ये केलेल्या कामासाठी देय भाववाढीचे रक्कम रु.१०,५३,८४,२८७/- मात्र प्रकल्पाचे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्या कडुन सदर कामी खातरजमा करुन भाववाढीचे पहिले धावते देयक अदा करण्यात आलेले आहे.

मे. ईगल इन्फा इंडीया लि. उल्हासनगर, कंत्राटदार यांनी प्रकल्प पुर्णत्वास प्रकल्पाची अपेक्षित भाववाढ रक्कम रु.२१,८०,५७,५०२/- इतकी होणार असले बाबत व धावते देयक क्र. २६ ते धावते देयक क्र. ३६ साठी रक्कम रु.१०,५३,८४,२८७/- मात्र व अतिरिक्त रक्कम रु.६,८०,३५,३१६/- मात्र असे एकुण रक्कम रु.१७,३४,१९,६०३/- मिळणे कामी मागणी केली असता सदर बाबत मा. आयुक्त सो. यांचे दालनात दि.२९/११/२०२४ रोजी प्रकल्पाचे तांत्रिक सल्लागार मजीप्रा अधिकारी, मनपाचे मु.ले.वि.अ. व कंत्राटदार यांचे उपस्थितीत बैठक झाली.

सदर बैठकीमध्ये मा.आयुक्त सो. यांनी भाववाढी मधील तफावती संदर्भात प्रकल्पाचे तांत्रिक सल्लागार महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना प्रकल्पाच्या उर्वरीत कामास होणाऱ्या संभावीत भाववाढीचे दर तपासणी करुन होणाऱ्या भाववाढी बाबत अभिप्राय अहवाल सादर करणे बाबत निर्देश दिलेले आहेत.

त्याअनुषंगाने प्रकल्पाचे तांत्रिक सल्लागार महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना प्रकल्पाच्या उर्वरीत कामास होणाऱ्या संभावीत भाववाढीचे दर तपासणी करुन होणाऱ्या भाववाढी बाबत अभिप्राय अहवाल सादर करणे कामी कळविण्यात आले होते. त्यानुसार कार्यकारी अभियंता, मजीप्रा यांनी प्रस्ताव तपासुन मनपास अहवाल सदर केला असुन तो खालील प्रमाणे आहे.

सदरची भाववाढ परिगणना दि. ०१.०७.२०२२ ते दि. ३१.०३.२०२५ पर्यंत मंजुर केलेल्या ४ थ्या व ५ व्या मुदतवाढीच्या प्रस्तावात नमूद केल्यानुसार ठेकेदारास देय असल्याने करण्यात आली आहे.

सदर योजनेचे धावते देयक क्र. २७ दि.२०/१०/२०२२ ते धावते देयक क्र. ३६ दि.१६/०१/२०२४ तसेच योजना कार्यान्वित करण्यासाठी निविदेत अंतर्भूत असलेली उर्वरित कामे याचा अंतर्भाव करून लागणाऱ्या परिमाणांच्या अनुषंगाने भारत सरकारच्या - Economic Adviser या संकेत स्थळावरील WPI (Wholesale Price Index) तसेच Labour Bureau of India या संकेत स्थळावरील Labour Index यांच्या माहे ऑक्टोबर २०२२ ते चालू कालावधीनुसार उपलब्ध ऑक्टोबर २०२४ चे निर्देशांक गृहीत धरून भाववाढीची परिगणना करण्यात आली आहे.

इंधनावरील (POL) भाववाढ परीगणित करताना HSD चे मुंबईतील दर उपलब्ध होत नसल्याने त्या ऐवजी डीझेल चे Economic Adviser या संकेत स्थळावरील निर्देशांक विचारात घेण्यात आले आहेत. HSD चे मुंबईतील दर IOC यांचेकडून उपलब्ध करून घेण्याकरिता आवश्यक पत्रव्यवहार विभागामार्फत करण्यात आलेला आहे.तसेच यानुसार नमूद करण्यात येते कि भविष्यात होणाऱ्या कामासाठी ऑक्टोबर २०२४ नंतरचे निर्देशांक लागू झाल्यास भाववाढीच्या रकमेत बदल होऊ शकतो.

स्वीकृत निविदेतील भाववाढ कलमाच्या सूत्रात भाववाढीकरिता मूळ निर्देशांक हे निविदा स्वीकृती सादर करण्याच्या महिन्याच्यापूर्वीचे लगतच्या तीन महिन्याचे सरासरी निर्देशांक घ्यावयाचे आहेत. तथापि निविदा स्वीकृती वेळी तसेच फेब्रुवारी २०१९ मध्ये कंत्राटदार व मनपा यांच्यात झालेल्या पुरवणी करारनाम्यानुसार सदर निविदेस भाववाढ कलम लागू नसल्याचे नमुद केले आहे.

तदनंतर भिवंडी निजामपूर शहर महापालिकेकडून ४थी मुदतवाढ मंजूर करताना कंत्राटदाराला भाववाढीचा फायदा देण्यात आलेला आहे. मात्र अशा प्रकारे भाववाढीच्या परिगणनेकरिता मूळ भाववाढ निर्देशांक कोणत्या कालावधीचे लागू राहतील याबाबत कोणताही उल्लेख करण्यात आलेला नाही.

त्यामुळे आता भाववाढ परीगणनेकरिता मनपा व कंत्राटदार यामध्ये झालेल्या पुरवणी करारनाम्याचा कालावधी विचारात घेऊन सन २०१९ च्या पहिल्या तिमाहीचे सरासरी निर्देशांक विचारात घेण्यात आलेले आहेत. यानुसार सदर गृहीत धरण्यात आलेल्या मूळ निर्देशांकास मनपा कडून मान्यता घेणे आवश्यक आहे.

सदर निविदेच्या निविदापुर्व बैठकीच्या, इतिवृत्तानुसार भाववाढ कलमाकरिता सिमेंट व स्टील याकरिता घेण्यात आलेले तारांकित दर (Star Rate) वगळण्यात आलेले आहेत. त्यामुळे आता सिमेंट व स्टील याबाबी करिता भाववाढ परीगणित करताना सूत्रातील Co= Basic rate of cement in Rs. Per M.T. as considered for working out value of "P" व So= Basic rate of HYSD/Mild steel in Rs. Per M.T. as considered for

working out value of "P" हे निविदेतील दरांकरिता आधारित मजीप्राच्या सन २००९-१० च्या दर सूचीनुसार दर घेण्यात आले आहेत.

अश्याप्रकारे परीगणित करण्यात आलेल्या बाब निहाय भाववाढीचा तपशील हा पुढील प्रमाणे असून त्यानुसार भाववाढीची एकुण रक्कम रु. १९,८५,०६,०४५/- इतकी येत आहे.

i) Labour- Rs.9,25,35,414/-

ii) Material- Rs.7,73,66,589/-

iii) POL- Rs.2,11,98,104/-

iv) Cement- Rs.25,02,968/-

v) Steel- Rs.49,02,970/-

**ठेकेदाराकडून सादर केलेल्या भिवंडी निजामपूर शहर महापालिकेकडून पुढील कार्यवाहीसाठी या कार्यालयास सादर करण्यात आलेल्या रु.२१,८०,५७,५०३/-एवढ्या रकमेच्या प्रस्तावाची छाननी केल्यानंतर आवश्यक ती दुरुस्ती करून रु.१९,८५,०६,०४५/- या रकमेचा भाववाढ प्रस्ताव तयार करण्यात आलेला आहे.**

त्याअनुषंगाने सदर रु.९,३१,२१,७५८/- एवढ्या किंमतीच्या भाववाढीचा प्रस्ताव तपासणीसाठी सादर केला आहे. सदर भाववाढ प्रस्ताव सर्वसाधारणपणे योग्य असून संदर्भ क्र.१ मधील अटी व तसेच खालील अटींची खातरजमा भिवंडी निजामपूर महानगरपालिका स्तरावर उचित कार्यवाही करावी.

१. मंजूर निविदा व कार्यादेशातील निविदा अटी व शर्तीनुसार भाववाढ प्रस्ताव असल्याबाबत खातरजमा करावी.

२. मुळ करारनामा व मुदत वाढीतील अटी व शर्तीनुसार भाववाढ प्रस्ताव असल्याबाबत खातरजमा करावी.

३. जानेवारी २०२३ ते २०२४ या कालावधीतील (देयक क्र. २७ ते ३६ व उर्वरित कामाचे प्रस्तावित देयक) भाववाढ प्रस्तावित असल्याबाबत खातरजमा करावी.

४. देयक क्र. २७ ते ३६ मोजमापांच्या दिनांक व भाववाढ देयकात घेण्यात आलेले त्रिमाही निर्देशांक तारांकित दर यांची फेर तपासणी मनपा स्तरावर करावी.

५. इंधनावरील भाववाढ परिगणना करतांना HSD चे मुंबईतील दर IOC चे दर प्राप्त करुनच भाववाढ रक्कम अंतिम करावी.

६. भविष्यात होणाऱ्या कामासाठी ऑक्टोबर २०२४ नंतरचे निर्देशांक लागू झाल्यास भाव वाढीच्या रक्कमेत बदल होऊ शकतो यांची नोंद घ्यावी व त्यानुसार आवश्यक ती योग्य ती कार्यवाही म.न.पा., भिवंडी स्तरावर करावी.

७. शिल्लक कामासाठी घेण्यात आलेले मुळ निर्देशांकास मनपाची मान्यता घेणे बंधनकारक राहील.

८. **राज्यस्तरीय प्रकल्प मान्यता समितीच्या निर्देशानुसार भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेस शासनाकडुन सदर प्रकल्पाच्या देय भाववाढीसाठी देय रक्कम अदा करण्यासाठी शासनाकडुन कोणतेही अनुदान उपलब्ध करुन देण्यात येणार नसल्याने, महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग यांचे पत्र क्र.नगरो-२०२४/प्र.क्र.५२२/नवि-३३, दि.०४ ऑक्टोबर २०२४ नुसार सदर देयकाची रक्कम भिवंडी निजामपूर महानगरपालिका यांनी स्वनिधीतून देणे आवश्यक राहील याबाबत महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी अभिप्राय**

दिलेला असुन उपरोक्त सर्व बाबींची पुर्तता करुन देयक महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यालयास सादर करणे बाबत कळविले आहे.

भुयारी गटार योजना टप्पा-२ प्रकल्पाच्या कामाच्या संभावीत भाववाढीच्या प्रस्तावाची छाननी केल्यानंतर आवश्यक ती दुरुस्ती करून रु.१९,८५,०६,०४५/- या रकमेचा भाववाढ प्रस्ताव प्रकल्पाचे तांत्रिक सल्लागार मजीप्रा यांनी सादर केलेले असुन एकुण रक्कम रु. १९,८५,०६,०४५/- मात्रच्या संभावीत भाववाढीच्या प्रस्तावास उपरोक्त मुद्दा क्र. ५ मध्ये नमुद HSD चे IOC चे मुंबईतील दरांच्या अधिन राहुन भाववाढीचा प्रस्ताव तयार करण्यात आलेला आहे.

सद्य कालावधीत मा. महासभा व मा. स्थायी समिती संपुष्टात आलेली आहे. शासन आदेश क्र. एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२)नवि-१४, दि.०६ जुन २०२२ रोजी नुसार मा. महासभा व मा. स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेसाठी प्रशासक नियुक्त करण्यांत आलेले आहेत. त्यामुळे भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेचा कार्यभार हे प्रशासक पहात आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार निविदा विषयक संविदा करण्याचे अधिकार मा. प्रशासक यांना आहेत.

उपरोक्त नमुद पाणी पुरवठा व मलःनिस्सारण विभागाकडील नगरोत्थान अभियान अंतर्गत भिवंडी निजामपुर भुयारी गटार योजना टप्पा-२ योजनेच्या उर्वरित कामाच्या भाववाढी बाबत प्रस्तावाच्या अतिरिक्त प्रशासकिय ठरावास मंजुरी देणे बाबतचा प्रस्ताव.

**प्रशासकिय ठराव क्रमांक :** ७०८ **दिनांक :** 20/12/ २०२४

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा व मलःनिस्सारण विभागाकडील नगरोत्थान अभियान अंतर्गत भिवंडी निजामपुर भुयारी गटार योजना टप्पा-२ योजनेच्या उर्वरित कामाच्या भाववाढी बाबत प्रस्तावाच्या अतिरिक्त प्रशासकिय ठरावास मान्यता मिळणे बाबतचा प्रस्ताव कार्यकारी अभियंता व अति. आयुक्त यांनी शिफारस केल्यानुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र. एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२)नवि-१४, दि.०६ जुन २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी, अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका पाणी पुरवठा व मलःनिस्सारण विभागाकडील नगरोत्थान अभियान अंतर्गत भिवंडी निजामपुर भुयारी गटार योजना टप्पा-२ योजनेच्या उर्वरित कामाच्या भाववाढी बाबत प्रस्तावाच्या अतिरिक्त प्रशासकिय ठरावास मंजुरी देत आहे.

**(अजय वैद्य)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी नि.शहर महानगरपालिका,भिवंडी.**